# पार्श्वभूमी

दिनांक २९ जानेवारी २०१८ सोमवार — गंमत भंडारी — ई-पेपर : www.parshvbhumi.com — L/Beed/52/2015-17 RNI


## छत्रपती महाविद्यालयाच्या संचालनाते सर्वजन मंत्रमुग्ध

खर्डा: श्री संत गजानन महाविद्यालय श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व किलबिल इंग्लीश स्कूल खर्डा यांच्या वतीने शैक्षणिक संकुलात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख ध्वजारोहन समारंभ माजी जि.प.सदस्य कांतीलाल खिंबरा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. उपस्थितांचे स्वागत प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी केले खर्डा येथील ऐतिहासिक किल्यावर शासकीय ध्वजारोहणासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेला.

# झुंजार नेता

राष्ट्र ■ गुरुवार दि. १ फेब्रुवारी २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Be


## छत्रपती महाविद्यालयाच्या संचालनाने सर्वजन मंत्रमुग्ध

खर्डा ,दि.३१ (प्रतिनिधी) :-श्री. छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय, श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व किलबिल इंग्लीश स्कूल, खर्डा यांच्या वतीने शैक्षणिक संकुलात प्रजासत्तोक दिल उत्साहात साजरा करण्यात आला, प्रमुख ध्वजारोहन समारंभ माजी जि.प. सदस्य मा.श्री. कांतीलाल खिवसरा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी खर्डा येथील उद्योग श्री. नंदूशेठ लगड, श्री. जवाहरलाल शहा तसेच डॉ, विवेक दिंडोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थितींचे स्वागत श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ, मोहन गुळवे यांनी केले. खर्डा येथील ऐतिहासीक किल्यावर शासकीय ध्वजारोहणासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. खर्डा शहरात यानिमित्ताने शिस्तबध्द संचालन विद्यार्थ्यांनी सादर केले. किल्यासमोरील झालेल्या समारंभमध्ये विद्यार्थ्यांनी विविध शारीरिक कसरती करून उपस्थितांची मने जिंकली. लेझीम पथकाद्वारे समारंभामध्ये विद्यार्थ्याने जोश भरला.

याप्रसंगी संस्थेच्या संचालिका सौ. चंदाताई गोलेर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रायार्य श्री. लक्ष्मण घोडके, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची उपस्थिती होती. या विशेष कार्यक्रमाचे कौतूक संस्थेचे सचिव श्री. डॉ. महेश गोलेकर यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रिडा संचालक प्रा. राजू म्हेत्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

लोकमत
अहमदनगर
अहमदनगर, रविवार, दि. ११ फेब्रुवारी २०१८

## श्री संत गजानन महाराज प्रकट दिन

खर्डा : श्री संत तनपुरे यांच्या हस्ते श्रीं



पूजन करुन तीन दिवस सोहळा साजरा करण्यात आला. संपत महाराज जायभाय यांचे प्रवचन होऊन बापू महाराज रंधवे यांचे काल्याचे कीर्तन झाले. प्रकट दिनादिवशी काल्याचे कीर्तन झाल्यावर महाप्रसाद भक्तांना वाटप करण्यात आले. डॉ.महेश गोलेकर यांनी आभार मानले.

कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ४७००१/१९८८ । वर्ष : ३१ अंक : १८७ www.faceb

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १६+४ = २०, किंमत: ₹ ३.००

अहमदनगर, बुधवार, दि. २१ फेब्रुवारी २०१८

शाला पागाट कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

## प्रकट दिनानिमित्त खर्डा येथे रक्तदान

खर्डा : संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त संत गजानन महाविद्यालय, छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन सरपंच संजय गोपाळघरे व सेवा संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गोलेकर यांच्याहस्ते झाले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य विजय गोलेकर, माजी सरपंच शिवकुमार गुळवे, माजी उपसरपंच भागवत सुरवसे, डॉ. बिपीनचंद्र लांड यांची उपस्थिती होती. शिबिरासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा.मोसिन शेख, प्रा. डॉ. भारत मेंगडे, प्राचार्य मोहन गुळवे, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्रा. श्रीकांत तनपुरे, प्रा. शिवानंदन जाधव, प्रा. धनंजय जवळेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सीतारामगडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांचे काल्याचे कीर्तन होऊन भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी आभार मानले.

ोजनालय सुरू

www.maharashtratimes.com

# महाराष्ट्र टाइम्स

एकमेव निष्पक्ष वृत्तपत्र

अहमदनगर । गुरुवार, २२ फेब्रुवारी २०१८ । पाने १६ (अहमदनगर टाइम्ससह) । शहर आवृत्ती । ₹ ३.००

एकच इंडस्ट्री



## यशवंत प्रतिष्ठानतर्फे १०१ पुस्तकांचे वाटप

**जामखेड :** सोनई येथील यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने जामखेड तालुक्यातील खर्डा येथील संत गजानन महाविद्यालयास १०१ पुस्तके भेट देण्यात आली. माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत गडाख यांच्यामार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या पुस्तकांचे ज्ञान अवगत व्हावे या दृष्टिकोनातून जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांनी लिहिलेली पुस्तके भेट देण्याचा संकल्प केला आहे. त्या प्रमाणे याची सुरुवात नगर जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेल्या जामखेड तालुक्यातील खर्डा येथील संत गजानन विद्यालयास बुधवारी (२१ फेब्रुवारी) १०१ पुस्तके भेट देऊन झाली.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
अहमदनगर, गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी २०१८





संत गजानन महाविद्यालयास १०१ पुस्तके भेट देताना प्रा. आर. बी. दरंदले, बी. बी. सोनवणे.

# यशवंत सामाजिक प्रतिष्ठानतर्फे गजानन कॉलेजला पुस्तके भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

जामखेड : यशवंत सामाजिक प्रतिष्ठान, सोनई यांच्या वतीने खर्डा (ता. जामखेड) येथील संत गजानन महाविद्यालयास १०१ पुस्तके भेट देण्यात आली.

ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांच्या अमृत महोत्सवानिमित्त यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत गडाख यांच्या मार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना निरनिराळ्या पुस्तकाचे ज्ञान अवगत व्हावे हा दृष्टीकोन ठेवून जिल्ह्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी लिहिलेली पुस्तके भेट देण्याचा संकल्प करण्यात आला.

या संकल्पास या महाविद्यालयापासून सुरुवात करण्यात आली. नगर जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेल्या खर्डा येथील संत गजानन महाविद्यालयास २१ फेब्रुवारी रोजी १०१ पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी यशवंत संस्थेचे प्रा. आर जी दरंदले, बी. बी. सोनवणे, गजानन महाविद्यालयाच्या चंदाताई गोलेकर, लक्ष्मण घोडके, शिवानंद जाधव, धनंजय जवळेकर, महेश बजगुडे, आदिनाथ खेडकर उपस्थित होते.

दैनिक
दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १२+४=१६ । किंमत ₹ ४.००
अहमदनगर गुरुवार, २२ फेब्रुवारी २०१८

## जामखेड खर्डा येथील संत गजानन विद्यालयास १०१ पुस्तके भेट

सोनईच्या यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने खर्डा येथील संत गजानन विद्यालयास १०१ पुस्तके भेट देण्यात आली. माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या अमृत महोत्सवानिमित्त यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत गडाख यांनी ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांनी लिहिलेली पुस्तके भेट देण्याचा संकल्प केला आहे. नगर जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेल्या खर्डा येथील संत गजानन विद्यालयास बुधवारी १०१ पुस्तके भेट देण्यात आली. या वेळी यशवंत संस्थेचे प्रा. आर. जी. दरंदले, बी. बी. सोनवणे, गजानन महाविद्यालयाच्या चंदा महेश गोलेकर, लक्ष्मण घोडके, शिवानंद जाधव, धनंजय जवळेकर, महेश बजगुडे, आदिनाथ खेडकर उपस्थित होते.

# झुंजार नेता

...हाराष्ट्र ■ बुधवार दि. ७ मार्च २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201


## श्री संत गजानन महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

खर्डा, दि. ६ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलीत श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय खर्डा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने व संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांच्या प्रेरणेने युवा सामाजिक कार्यकर्ते कै. मयुर कांकरीया यांना भावपुर्ण श्रध्दांजली म्हणुन भव्य अशा रक्तदान शिबीराचे आयोजन खर्डा बसस्थानका शेजारील डॉ. बीपीनचंद लाड यांच्या हॉस्पिटलमध्ये दि. ९/३/२०१८ रोजी करण्यात आले आहे.

या रक्तदान शिबीरासाठी बीड येथील जिल्हा शासकीय रक्तपेढीचे सहकार्य घेण्यात येणार आहे. या शिबीरामध्ये खर्डा पंचक्रोशीतील युवकांनी व विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी केले आहे. या शिबीराचे उद्‌घाटन खर्डा गावचे सरपंच संजय गोपाळघरे यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी माजी प. स. सदस्य विजयसिंह गोलेकर, तसेच विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत गोलेकर, माजी जि. प. सदस्य कांतीलाल खिवसरा, सातेफळचे सरपंच गणेश लटके, माजी सरपंच शिवकुमार गुळवे, पत्रकार संतोश थोरात, दत्तराज पवार यांची उपस्थिती राहिल.

लोकमत
# अहमदनगर
अहमदनगर, शुक्रवार, दि. ९ मार्च २०१८

महत्वाचे

## खर्ड्यात निर्भय कन्या अभियान

खर्डा : श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित श्री संत गजानन महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने गुरुवारी निर्भय कन्या अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा लक्ष्मण घोडके होते. या अभियानाचा शुभारंभ प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांच्या हस्ते झाला. महिला सबलीकरणाच्यादृष्टीने व्याख्यान व प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मारुती ढसाळ, प्रा. विनायक बनकर, लक्ष्मण उदमले, सविता गोलेकर, विनायक बनकर, महिला, मुली उपस्थित होत्या. सविता गोलेकर म्हणाल्या, महिला अबला नसून सबला आहेत. महिलांनी अंधश्रद्धेवर मात करुन वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले. लक्ष्मण उदमले यांनी युवतींना स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. प्रास्ताविक प्रा. वैशाली कुलकर्णी, प्रा श्रीकांत तनपुरे यांनी केले. प्रा. उर्मिला खेडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुनील गोलेकर यांनी आभार मानले.

लोकमत
अहमदनगर
अहमदनगर, शनिवार, दि. १० मार्च २०१८

# खर्ड्यात रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : मयूर कांकरिया यांच्या स्मरणार्थ श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, खर्डा संचलित श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत व बीड येथील शासकीय रक्त पेढीच्या मदतीने खर्डा (ता.जामखेड) येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले.

सरपंच संजय गोपाळघरे यांनी मयूर कांकरिया यांच्या प्रतिमेचे पूजन केले. ग्रामपंचायत सदस्या वैशाली थोरात, प्रा. उर्मिला खेडकर, प्रगती नागरगोजे, कांता जायभाय, सुषमा इंगळे या विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. खर्डामधील अनेकांनी रक्तदान करून ५४ रक्त बाटल्याचे संकलन झाले.

शिबिर यशस्वीतेसाठी माजी पं.स. सदस्य विजयसिंह गोलेकर, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्रा. मोहन गुळवे, प्रा. डॉ. मेंगडे, प्रा. आदिनाथ खेडकर, ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे, विकास शिंदे, संजय सुर्वे, प्रा. वैशाली कुलकर्णी, प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# पार्श्वभूमी

१ दिनांक ११ मार्च २०१८ रविवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | L/Beed/52/2015-17 | RNI Re


## श्री संत गजानन महाविद्यालयाच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न

बीड दि.०९(प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने तर्फे सामाजिक युवा कार्यकर्ते कै.मयूर कांकरीया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ खर्डा बसस्थानका शेजारीला डॉ.बिपीनचंद्र लाड यांच्या हॉस्पीटल मध्ये रक्तदान शिब्रीराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबीराचे उद्घाटन खर्डा गावचे सरपंच संजयजी गोपाळधरे व मा.प.समिती सदस्य श्री विजयसिंह गोलेकर यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मो.ना. गुळवे यांनी रक्तदान महत्व विद्यार्थ्यांना विशद केले. या रक्तदान शिबीरामध्ये सरपंच श्री संजय गोपाळघरे, मा.स.समिती सदस्य विजसिंह गोलेकर, ग्रामपंचायत सदस्य विकास शिंदे, महालिंग कोरे, बबलु सुरवसे, रा.काँ.पार्टी चे शहर अध्यक्ष संतोष लष्करे, पत्रकार संतोष थोरात, ग्रामविकास अधिकारी रमेश राठोड यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या रक्तदान शिबीरामध्ये कै.मयुर कांकरिया मित्र मंडळ व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याप्रसंगी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबीरासाठी बीड येथील शासकीय रक्तपेढीचे तंत्रज्ञ एम.एम येवले व परिचर एस.एस राऊत यांनी साह्य केले.

बीडचा
लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
रविवार दि.११ मार्च २०१८ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHM



# साठे चौकातील सिग्नलचे विद्युत बिल वसुल होईल काय-डॉ.गोलेकर

बीड । वार्ताहर

शहरातील साठे चौकात बसविलेला सिग्नल सुभाष रोडकडे वळण्यास बंद केल्यामुळे निरुपयोगी ठरला, परंतु लाखो रुपये खर्च करुन उभारलेला सिग्नल मात्र विद्युत पुरवठा खंडीत न केल्यामुळे चालूच राहिला गेला. अनेक महिन्यापासून सुरु असल्यामुळे हजारो रुपयांची विज मात्र वाया गेली याचे सुतक ना कर्मचाऱ्याला ना अधिकाऱ्याला.कोणत्याही संबंधित कर्मचाऱ्यांना हा रात्रंदिवस चालू असलेला सिग्नल दिसला नसेल काय? आपल्या सारखे जागृत नागरीक मात्र तेथून जाताना अस्वस्थ होतात. संबंधित सिग्नल त्वरीत बंद करुन कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे कर्तव्य संबंधितांनी पार पाडण्याची अपेक्षा युवक बिरादरींचे डॉ.महेश गोलेकर यांनी केली आहे आणि हे झाले नाही तर संत तुकाराम महाराज यांच्या तुका म्हणे ऐसा नरा। मोजून माराव्या पैजरा, या उक्तीप्रमाणे जनतेला करावे लागेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी असे डॉ.गोलेकर यांनी म्हटले आहे.

वर्ष : १३८

Regd. No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

# केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ६८ ● पृष्ठे : ... C (अहमदनगर आवृत्ती)★★





## खर्ड्याच्या ऐतिहासिक लढाईला २२३ वर्ष पूर्ण.

खर्डा, (वार्ताहर) : खर्डा येथील ऐतिहासीक लढाई ११ मार्च १७९५ रोजी झाली. मराठ्यांच्या इतिहासातील या अभिमानस्पद प्रसंगाला रविवारी २२३ वर्ष पूर्ण झाली. मराठ्याच्या शेवटच्या विजयाच्या गौरवशाली इतिहासाचा साक्षीदार आसलेल्या खर्डा परिसराला त्यामुळे अनन्यसाधरण महत्व आहे. खर्ड्याच्या किल्यावर शिवप्रतिमेचे पूजन शिव प्रेमी युवक व खर्डा गावचे सरपंच संजय गोपाळघरे यानी केले.

या प्रसंगी भा.ज.पा. तालुकाध्यक्ष रवि सूरवसे, वैजीनाथ पाटील, विकास शिंदे, अनिल धोत्रे व हजारो शिवप्रेमी हजर होते. यानंतर शिव प्रेमीनें शहरातून भगवे ध्वज घेवून मोटार सायकल रॉली काढून ही रॅली खर्ड्यापासून सात कि. मी. अंतरावर असणारी रनटेकडी ज्या ठिकाणी युध्द होवून मराठ्यांना विजय मिळाला. त्या ठिकानी शिवप्रेमींनी विजय स्तंभ उभारून त्याचे पूजन केले. या कार्यक्रमाच्या ठिकाणी इतिहास अभ्यासक प्रा. धनंजय जवळेकर यांनी व्याख्यान सांगितले. ते म्हणाले खर्ड्याची लढाई ही एकतेचे संदेश देणारी आहे. हर हर महादेव, जय शिवाजींच्या गर्जनेने परिसर दुमदुमला. शुभम रणभोर यांनी शिवप्रेमींचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

झुंजार नेता

महाराष्ट्र ■ सोमवार दि. १२ मार्च २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal Nc - L/29/RNP

## मराठ्यांच्या विजयाची साक्ष देणाऱ्या

# रणटेकडी येथे विजयी स्तंभाची उभारणी

जामखेड, दि.११ (प्रतिनिधी):- अकरा मार्च १७९५ यादिवशी अनेक मराठा सरदारांनी निजाम शाहिला पराभूत करून विजय मिळविला हाच तो खर्डा येथील किल्ला येथील रणटेकडी अनेक वर्षे झाले तरी दुर्लक्षित असलेली रणटेकडी मराठ्यांच्या विजयाची साक्ष देणारी याठिकाणी आकारा मार्च रोजी श्री शिवप्रतिष्ठान चे अध्यक्ष पांडुराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विजय स्तंभ उभारण्यात आले येथे तालुक्यातील पाचशे शिवभक्तांनी किल्ला स्वच्छ करून फुलांनी सज़ावट केली व शिवमूर्ती पूजन केले व खर्डा शहरातूनभव्य मोटार सायकल रॅली काढली यावेळी रणटेकडी येथे विजय स्तंभाचे पूजन दादा सरनोबत संजय काशीद आलेश जगदाळे गणेश पवार चत्रभुज बोलभट सरपंच संजय गोपाळघरे पं सदस्य रवी सुरवसे वैजीनाथ पाटील टेकाळे मेजर यांचे हस्ते करण्यात आले



याठिकाणी दांडपट्टा लाठी काठी चे प्रात्यक्षिक माऊली जमदाडे यांनी सादर केले व प्रा धनंजय जवळेकर यांनी लढ्याची सविस्तर माहिती दिली

याकार्यक्रमासाठी आयोजन पांडुराजे भोसले दिगांबर भांबे शुभम रणभोर सुजित पवार महेश भोसले पंकज पवार महादेव तागदे निलेश जाधव यांनी केले

लोकमत
अहमदनगर
अहमदनगर, सोमवार, दि. १२ मार्च २०१८





खर्डा भुईकोट किल्ल्यावर रविवारी किल्ला दरवाजावर शिवप्रतिमेचे पूजन सरपंच संजय गोपाळघरे, भाजपचे तालुकाध्यक्ष रवी सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले.

# खर्डा किल्ल्यावर शौर्यदिन साजरा

## शिवप्रतिमेचे पूजन : मराठवाड्यातून शिवप्रेमींची किल्ल्याला भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : मराठ्यांच्या विजयाचे प्रतीक म्हणून तसेच लढाईला २२३ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल खर्डा भुईकोट किल्ल्यावर रविवारी जामखेड तालुक्यासह मराठवाड्यातील शिवप्रेमी एकत्र आले. किल्ला दरवाजावर शिवप्रतिमेची पूजन सरपंच संजय गोपाळघरे, भाजपचे तालुकाध्यक्ष रवी सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे तालुकाध्यक्ष पांडूराजे भोसले, दादा सरनोबत, संजय काशीद, गणेश पवार, शुभम रनभोर, वैजीनाथ पाटील, तुळशीदास गोपाळघरे, मनोज पवार, अनिल धोत्रे, सुनील गोलेकर, रुपेश खारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

प्रतिमा पूजन झाल्यावर विजयीरथ व मोटारसायकल रॅली काढण्यात आली. ही रॅली किल्ला मैदानाशेजारी ११ मार्च १७९५ ला कुटनितीज्ञ नाना फडणवीस आणि रणझुंजार महादजी शिंदे आणि मर्द मावळ्यांनी निजामशाही मातीत घालून रणटेकडीवर भगवा झेंडा डोलत ठेवून रणात विजय मिळवला. तोच दिवस ११ मार्च (रविवार) शौर्यदिन म्हणून साजरा केला जातो.

पवित्र पावन भूमी रणटेकडी याच ठिकाणी विजयाचं प्रतिक म्हणून विजयस्तंभ उभारला आहे तेथे रविवारी सर्व शिवप्रेमी जमा झाले. रामटेकडीवर इतिहासकार प्रा.धनंजय जवळेकर यांचे व्याख्यान झाले. ते म्हणाले, मराठ्यांचा विजय आजही प्रेरणादायी आहे. खर्ड्याची भूमी एकतेचा संदेश देणारी आहे. एकत्रित येऊन विजय कसा संपादन करावा हें एकच ज्वलंत उदाहरण आहे. यावेळी उपस्थित शिवप्रेमी मुले, मुली यांनी दांडपट्टा, लाठी-काठी, तलवारबाजी असे चित्तथरारक प्रात्याक्षिके सादर केली.

झुंजार नेता

ष्ट्र ■ मंगळवार दि. १३ मार्च २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RN

# श्री संत गजानन महाविद्यालयाच्यावतीने रक्तदान शिबीर संपन्न

खर्डा, दि.१२ (प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, खर्डा संचलित श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सामाजिक युवा कार्यकर्ते कै.मयूर कांकरिया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ खर्डा बसस्थानका शेजारील डॉ.बिपीनचंद्र लाड यांच्या हॉस्पीटलमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबीराचे उद्घाटन खर्डा गावचे सरपंच संजयजी गोपाळघरे व प.समिती सदस्य विजयसिंह गोलेकर यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मो.ना.गुळवे यांनी रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना विशद केले. या रक्तदान शिबीरामध्ये सरपंच संजय गोपाळघरे, प.समिती सदस्य विजयसिंह गोलेकर, ग्रामपंचायत सदस्य विकास शिंदे, महालिंग कोरे, बबलू सुरवसे, रा.काँ.पार्टीचे शहर अध्यक्ष संतोष लष्करे, पत्रकार संतोष थोरात, ग्रामविकास अधिकारी रमेश राठोड त्याच बरोबर सौ.वैशाली थोरात, कुमारी प्रगती नागरगोजे, कु.कोंता जायभाये, कु.सुषमा इंगळे यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या रक्तदान शिबीरामध्ये कै.मयूर कांकरिया मित्र मंडळ व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. याप्रसंगी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबीरासाठी बीड येथील शासकीय रक्तपेढीचे तंत्रज्ञ एम.एम.येवले व परिचर एस.एस.राऊत व वैद्यकीय अधिकारी डॉ.सौ.बांगर यांनी सहकार्य केले.

बीड-महाराष्ट्र

झुंजार नेता

• सोमवार, दि. २६ मार्च २०१८ • पान ३

# श्री संत गजानन महाविद्यालयात जल साक्षरता सप्ताह साजरा

खर्डा, दि २५ (प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयामध्ये जल साक्षरता सप्ताह साजरा करण्यात आला. या जल सप्ताहा अंतर्गत जलदिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी भुषविले. आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना त्यांनी नैसर्गिक साधनसंपतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी जनजागृतीचे महत्व विशद केले. पाणी माणसाला निर्माण करता येत नाही म्हणून ते वापरत असतांना त्यांची बचत हीच त्यांची निर्मिती होय असे उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितले. जामखेड महाविद्यालयांचे भूगोल विभागप्रमुख प्रा.डॉ.नरके एस.वाय.यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. प्रा.डॉ.नरके सरांनी पाण्याच्या संवर्धनासाठी करावयाच्या विविध उपाययोजना विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. जलसंवर्धनासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे माती बंधारा, साखळी बंधारा, वनराई बंधार्यांची निर्मिती करणे गरजेचे आहे. तसेच पाणी संवर्धन व जतन व्हावे यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जलदूत व्हावे असे आवाहन त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केले. संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पाणी हेच जिवन आहे असे सांगितले.

या कार्यक्रमाचे नेटके आयोजन महाविद्यालयांचे भूगोल विभागप्रमुख प्रा.शिवानंद जाधव येंनी केले तर सुत्रसंचालन प्रा.नकूल खवले यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.धनंजय जवळेकर यांनी केले.

# पार्श्वभूमी

दिनांक २६ मार्च २०१८ सोमवार

गंमत भंडारी

ई-पेपर : www.parshvbhumi.com

L/Beed/52/2015-17 RNI Reg


## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जलदूत व्हावे-प्रा.नरके

बीड दि.२५(प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयामध्ये जल साक्षरता सप्ताह साजरा करण्यात आला. या जल सप्ताहाअंतर्गत जलदिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी भूषविले आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना त्यांनी नैसिर्गीक साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन करण्यासाठी जनजागृतीचे महत्व विशद केले. पाणी मानसाला निर्माण करता येत नाही म्हणून ते दा रत असतांना त्याची बचत हीच त्यांची निर्मिती होय असे उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितले. जामखेड महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख प्रा.डॉ.नरके एस.वाय यांची प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थिती होती. प्रा.ऑ.नरेक सरांनी पाण्याच्या संवर्धनासाठी करावयाच्या विविध उपाययोजना विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. जलसंवर्धनासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे माती बंधारा, साखळी बंधारा, वनराई बंधारांची निर्मिती करणे गरजेचे आहे. तसेच पाणी संवर्धन व जतन व्हावे यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जलदूत व्हावे असे आवाहन त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केले. संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना पाणी हेच जीवन आहे असे सांगितले.

या कार्यक्रमाचे नेटके आयोजन महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख प्रा.शिवानंद जाधव यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा.नकूल खवले यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.धनंजय जवळेकर यांनी केले.

# झुंजार नेता

महाराष्ट्र ■ सोमवार दि. २६ मार्च २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RN


## विद्यार्थ्यांनी परीक्षार्थी होण्यापेक्षा ज्ञानार्थी व्हावे

खर्डा, दि २५ (प्रतिनिधी):- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयात कॉपी मुक्त अभियान राबविण्यात आले. श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय खर्डासारख्या ग्रमीण भागात असल्याने कॉपीमुक्त अभियानाची निकड भासते. संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान संस्था दरवर्षी राबवते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षा जवळ आल्या आहेत, त्या निमित्ताने विद्यार्थ्यांशी या विषयावर हितगुज करण्यासाठी जामखेड महाविद्यालयांचे भूगोल विभाग प्रा.सुनिल नरके याची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.सुनिल नरके सरांनी कॉपीने मिळवलेले मार्क हे यशस्वी जिवनाची पायाभरणी करु शकत नाहीत. खरे ज्ञान हेच कर्मामध्ये रुपांतरीत होवून यशप्राप्तीचा मार्ग दाखवते असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी महाविद्यालय कॉपी मुक्त व्हावे अशी अपेक्षा विद्यार्थ्यांसमोर व्यक्त करत कॉपी करणे हा विद्यापीठ कायद्यानुसार गुन्हा आहे व त्यांचे परिणाम, शिक्षा याविषयी विद्यार्थ्यांना अवगत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयांचे परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नकुल खवले यांनी केले. तर सुत्रसंचालन प्रा.धनंजय जवळेकर यांनी केले.

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

१ दिनांक ३ एप्रिल २०१८ मंगळवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RN


## नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन

बीड, दि.२(प्रतिनिधी):- श्री.छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री.संत गजानन महाविद्यालय व श्री.छत्रपती ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०५ एप्रील २०१८ रोजी भव्य नोकर भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या थेट नोकरभरीत मेळाव्यासाठी पुणे येथील टाटा मोटर्स भारत मोर्ज, जॉन डिअर, मदरसन इंडिया, ओरियंट रबर, बॉश, डयुरो अॅटो, कल्याणी लिमर्स, फिनोलॅक्स पॅल्सन इ.नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत.

या नोकरभरतीसाठी किमान शैणणीक अर्हता १२ वी पास आहे. बी.ए. पास/ नापास, आय.टी.आय. पास १२ वी इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, १२ वी लॉजीस्टीक अॅन्ड सप्लाय चैन मॅनेजमेंट, मेडीकल लॅब टेक्नीशिअन, उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी खर्डा पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना केले आहे.

सदर मेळाव्याचे आयोजन संस्थेच्या प्रांगणात सकाळी ठिक १०.०० ते ०४.०० या वेळेत केले आहे. तरी या स्पर्धेच्या युगात आलेल्या या सुवर्णसंधीचा लाभ आजी-माजी विद्यार्थ्यांनी घ्यावा अशी अपेक्षा श्री.संत गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन गुळवे व श्री.छत्रपती ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य लक्ष्मण घोडके यांनी व्यक्त केली आहे. या मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी प्रा.चंद्रकिशोर बारटक्के व प्रा.संजय होळंबे यांच्याकडे दि.०४ एप्रील २०१८ पर्यंत करावी.

झुंजार नेता

हाराष्ट्र ■ मंगळवार दि. ३ एप्रिल २०१८ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RN

# श्री छत्रपती संकुलात भव्य नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन

खर्डा, दि.२ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५/४/२०१८ रोजी भव्य नोकर भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या थेट नोकरभरती मेळाव्यासाठी पुणे येथील टाटा मोटर्स भारत मोर्ज, जॉन डिअर, मदरसन इंडिया, ओरियंट रबर, बॉश, ड्युरो अॅटो, कल्याणी लिमर्स, फिनोलॅक्स पॅल्सन इ नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या नोकरभरतीसाठी किमान शैक्षणिक अर्हता १२ वी पास आहे. बी. ए. पास / नापास, आय. टी. आय. पास १२ वी इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, १२ वी लॉजीस्टीक अॅन्ड चैन मॅनेजमेंट, मेडीकल लॅब टेक्नीशियन, उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे सचिव मा. डॉ. महेश गोलेकर यांनी खर्डा पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना केले आहे. सदर मेळाव्याचे आयोजन संस्थेच्या प्रागंणात सकाळी ठिक १० ते ४ या वेळेत केले आहे. तरी या स्पर्धेच्या युगात आलेल्या या सुवर्ण संधीचा लाभ आजी - माजी विद्यार्थ्यांनी घ्यावा अशी अपेक्षा श्री संत गजानन महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे व श्री छत्रपती ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा. लक्ष्मण घोडके यांनी व्यक्त केली आहे. या मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी प्रा. चंद्रकिशोर बारटक्के व प्रा. संजय होळंबे यांच्याकडे दि. ४/४/२०१८ करण्याचे आवाहन केले आहे.

झुंजारनेता
मंगळवार दि. ३ एप्रिल २०१८ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/

# श्री छत्रपती संकुलात भव्य नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन

खर्डा, दि. २ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५/४/२०१८ रोजी भव्य नोकर भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या थेट नोकरभरती मेळाव्यासाठी पुणे येथील टाटा मोटर्स भारत मोर्ज, जॉन डिअर, मदरसन इंडिया, ओरियंट रबर, बॉश, ड्युरो अँटो, कल्याणी लिमर्स, फिनोलॅक्स पॅल्सन इ नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या नोकरभरतीसाठी किमान शैक्षणिक अर्हता १२ वी पास आहे. बी. ए. पास / नापास, आय. टी. आय. पास १२ वी इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, १२ वी लॉजीस्टीक ॲन्ड चैन मॅनेजमेंट, मेडीकल लॅब टेक्नीशियन, उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे सचिव मा. डॉ. महेश गोलेकर यांनी खर्डा पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना केले आहे. सदर मेळाव्याचे आयोजन संस्थेच्या प्रांगणात सकाळी ठिक १० ते ४ या वेळेत केले आहे. तरी या स्पर्धेच्या युगात आलेल्या या सुवर्ण संधीचा लाभ आजी - माजी विद्यार्थ्यांनी घ्यावा अशी अपेक्षा श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे व श्री छत्रपती ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा. लक्ष्मण घोडके यांनी व्यक्त केली आहे. या मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी प्रा. चंद्रकिशोर बारटक्के व प्रा. संजय होळंबे यांच्याकडे दि. ४/४/२०१८ करण्याचे आवाहन केले आहे.

कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ४७००१/१९८८ । वर्ष : ३१ अंक : २३० www.faceboo

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ४.00 अहमदनगर, शुक्रवार, दि. ६ एप्रिल २०१८



खर्डा येथे आयोजित नोकर भरती मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी विविध कंपन्यांचे प्रतिनिधी.

## खर्ड्यात नोकर भरती मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** श्री छत्रपती आरोग्य व शिक्षण मंडळ संचलित श्री छत्रपती ज्युनिअर कॉलेज व श्री गजानन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने खर्डा (ता. जामखेड) येथे आयोजित नोकर भरती मेळाव्याचे उद्घाटन सरपंच संजय गोपाळघरे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ मोहन गुळवे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सेंट्रल बँकेचे मयूर लोणकर, संस्थेच्या संचालिका चंदा गोलेकर उपस्थित होते. यावेळी टाटा मोटर्स, भारत फोर्ज, कल्याणी किमर्स, फ्लॅश इलेक्ट्रॉनिक, जॉन डिअर मदर्सन इंडिया आदी पुणे येथील कंपनीच्या प्रतिनिधींनी हजेरी लावली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

लोणकर यांनी मार्गदर्शन केले. मेळावा यशस्वीतेसाठी प्रा. लक्ष्मण घोडके, प्रा. संजय होळबे, प्रा. डॉ. मेंगडे, प्रा. आदिनाथ खेडकर, प्रा. वैशाली कुलकर्णी, विद्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रा. सुनील गोलेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. चांद्रकिशोर बारटक्के यांनी सूत्रसंचालन केले. प्रा मोहसीन शेख यांनी आभार मानले.

झुंजार नेता

गुरुवार दि. ३ मे २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP

# खाजगी शिक्षण संस्थाची संघटना ही काळाची गरज - डॉ महेश गोलेकर

नगर, दि.२ (प्रतिनिधी):- शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या खाजगी संस्थानी एकत्र ऐवुन शासनाशी संघर्ष करण्यची आज गरज निर्माण झाल्याचे प्रतीपादन त्रत्रद्ध छत्रपती शिक्षण संास्थेचे सचिव डॉ महेश गोलेकर यांनी केले अहमदनगर जिल्हा खाजगी शिक्षण संस्था संघटनेची नुकतीच नगर येथे मिर्टींग झाली त्या प्रसंगी डा गोलेकर यांनी पुढे बोलताना सांतिले सध्यचे शासन शिक्षण संस्थाकडे पूर्वग्रह दूषित नजरेने पहात आसून शिष्यवृत्तीची फिस महाविधालयास न देता विधार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याचपा निर्णय घेतला आहे ,हा निर्णय संस्थाना अडचणीत आणनार आहे.

आशा अनेक आडचणी सोडविण्या करीता खाजगी शिक्षण संस्थानी एकत्र येणे काळाची गरज आहे. केंद्रिय माजी मंत्री व महाराष्ट शिक्षण संस्था महामंडळाचे अध्यक्ष मा. विजय नवल पाटील हे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या भाषणातून संपूर्ण राज्यातून संस्थेपुढे येणा-या अडचणी आढावा घेवून आपण स्वतः यासाठी नेहमी कार्य करीत असल्याचे यापुढेही करत राहु असे सांगितले.

याप्रसंगी जिल्हयातील १०० पेक्षा हि जास्त शिक्षण संस्थाचे प्रतिनिधी हजर होते. औरंगाबादचे श्री. जवळकर यांनी हि या प्रसंगी मार्गदर्शन केले. अहमदनगर जिल्हा अध्यक्ष मा. यशवंतराव गडाख यांनी मिर्टीगचे आयोजन केले होते. तर संघटनेच्या उपाध्यक्षा सौ. शिल्पा दुर्सिगे यांनी मिर्टिंगचे संयोजन केले.

# पार्श्वभूमी

दिनांक ३ मे २०१८ गुरुवार

गंमत भंडारी

ई-पेपर : www.parshvbhumi.com

L/Beed/52/2015-17


## खाजगी शिक्षण संस्थाची संघटना ही काळाची गरज-डॉ.महेश गोलेकर

नगर,दि.२(प्रतिनिधी):- शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या खाजगी संस्थांनी एकत्र येवुन शासाशी संघर्ष करण्याची आज गरज निर्माण झाल्याचे प्रतिपदान श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी केले. अहमदनगर जिल्हा खाजगी शिक्षण संस्था संघटनेचे नुकतीच नगर येथे मिटींग झाली त्या प्रसंगी डॉ.गोलेकर यांनी पुढे बोलतांना सांगितले सध्याचे शासन शिक्षण संस्थाकडे पूर्वग्रह दूषित नजरेने पाहत असून शिष्यवृत्ती फिस महाविद्यालयास न देता विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय संस्थांना अडचणीत आणनानारा आहे.

अशाअनेक अडचणी सोडविण्या करीता खाजगी शिक्षण संस्थांनी एकत्र येणे काळाची गरज आहे. केंद्रीय माजी मंत्री व महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळाचे अध्यक्ष विजय नवल पाटील हे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या भाषणातून संपूर्ण संस्थेपुढं येणाऱ्या अडचरी आढावा घेवुन आपण स्वत: यासाठी नेहमी कार्य करीत असल्याचे यापुढेही करत राहू असे सांगितले.

याप्रसंगी जिल्हयातील १०० पेक्षा ही जास्त शिक्षण संस्थाचे प्रतिनिधी हजर होते. औरंगाबादचे जवळकर यांनी ही या प्रसंगी मार्गदर्शन केले. अहमदनगर जिल्हा अध्यक्ष यशवंतराव गडाख यांनी मिटींगचे आयोजन केले होते. तर संघटनेच्या उपाध्यक्षा सौ.शिल्पा यांनी मिटींगचे संयोजन केले.

सायं. दैनिक बीड रिपोर्टर
संपादक : शेख तय्यब www.beedreporter.com
R.N.I. No.59885-93 R.No.L/13/STS/BEED/2018-20 पोस्टल दि.७ मे २०१९

# खाजगी शिक्षण संस्थाची संघटना, ही काळाची गरज–डॉ.महेश गोलेकर

नगर (रिपोर्टर): शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या खाजगी संस्थानी एकत्र येवून शासनाशी संघर्षकरण्याची आज गरज निर्माण झाल्याचे प्रतिपादन छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी केले. अहमदनगर जिल्हा खाजगी शिक्षण संस्था संघटनेची नुकतीच नगर येथे मिटींग झाली त्या प्रसंगी डॉ.गोलेकर यांनी पुढे बोलताना सांगितले सध्याचे शासन शिक्षण संस्थाकडे पूर्वग्रह दुषित नजरेने पाहत असून शिष्यवृत्तीची फिस महाविद्यालयास न देता विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय संस्थाना अडचणीत आणणारा आहे.

अशा अनेक अडचणी सोडविण्या करीता खाजगी शिक्षण संस्थानी एकत्र येणे काळाची गरज आहे. केंद्रीय माजी मंत्री व महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळाचे अध्यक्ष विजय नवल पाटील हे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या भाषणातून संपूर्ण राज्यातून संस्थेपुढे येणाऱ्या अडचणी आढावा घेवून आपण स्वत: यासाठी नेहमी कार्य करीत असल्याचे यापुढेही करत राहू असे सांगितले. याप्रसंगी जिल्ह्यातील १०० पेक्षाही जास्त शिक्षण संस्थाचे प्रतिनिधी हजर होते. औरंगाबादचे जवळकर यांनी ही या प्रसंगी मार्गदर्शन केले. अहमदनगर जिल्हा अध्यक्ष यशवंतराव गडाख यांनी मिटींगचे आयोजन केले होते. तर संघटनेच्या उपाध्यक्षा शिल्पा दुसिंगे यांनी मिटींगचे संयोजन केले.

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
बुधवार दि.६ जून २०१८ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMA

## श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचा ९८ टक्के निकाल

खर्डा । वार्ताहर

येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातील विज्ञान विभागाचा निकाल ९८ टक्के लागला आहे. प्रवेशित झालेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ५० विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल ७९ टक्के तर कला शाखेचा निकाल ६५ टक्के लागला आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या नीट परिक्षेमध्ये महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये मेगडे तनया ५४७, क्रांती जाधव ५३५ तर ऋतुजा खाडे ५१६ गुण घेऊन वैद्यकीय (एमबीबीएस) प्रवेशासाठी पात्र ठरल्या आहेत. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी गुणवंताचे व कर्मचारी वृंदाचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. महाविद्यालयात चालविण्यात येणाऱ्या एमएलटी इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी व लॉजीस्टीक सप्लाय अ‍ॅन्ड चैन मॅनेजमेंट या व्यवसाय अभ्यासक्रमामुळे तसेच विज्ञान व कला शाखेमुळे खर्डा पंचक्रोशीनी विद्यार्थ्यांचा या महाविद्यालयाकडे ओढा वाढला असून. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके यांनी गुणवंतांचे अभिनंदन करुन आवाहन केले आहे.

ड रिपोर्टर

र दि.६ जून २०१८ । पान ३ ■ ■ R.N.I.No.59885-93 ■

# नैतिकतेने नौकरी केल्यास हमी पगारातही सुखाचा फुलवता येतो–डॉ.महेश गोलेकर

बीड (रिपोर्टर):- वाहतुक नियंत्रक सुनिल साळुंके यांच्या खर्डा ग्रामस्थांच्या वतीने आयोजीत सेवापुर्ती समारंभ कार्यक्रमात छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी वरील उद्गार काढले.

पुढे बोलतांना त्यांनी एस.टी. कर्मचारी अत्यंत कमी पगारात नौकरी करीत असल्याचा उल्लेख केला. परंतु हीच नौकरी साळुंके यांनी नैकितेने केल्यामुळे त्यांना कुठेही वेतन कमी पडले नाही. स्वतःच्या गावामध्ये गेली अनेक वर्षापासुन वाहतुक नियंत्रक म्हणुन काम करत असतांना समाजकार्याचे भान ठेवुन चौडेंश्वरी नवरात्र मंडळ च्या माध्यमातुन गावामध्ये अनेक समाजउपयोगी उपक्रमाचे आयोजन करुन समाजकार्यामध्ये अग्रेसर असल्याचे दाखवून दिले. या प्रसंगी अनेक राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांना राजकारणात येण्याचे निमंत्रण दिले, परंतु राजकारणापासून दुर राहुनच खरी समाजसेवा करता येते असे सांगुन विनम्रणे नकार दिला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सिताराम गडाचे मठाधिपती महालिंग नगरे यांच्या शुभहस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देवुन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जामखेड आगारप्रमुख महादेव सिरसाट वाहतु निरीक्षक दिपक पवार कामगार संघटनेचे बाबासाहेब चितळे, सचि मासाळ तसेच खर्डा गावचे सरपंच संजय गोपाळघरे, पंचायत समिती सदस्य रविदादा सुरवसे, पंचायत समित सदस्य विजयसिंह गोलेकर, सरपंच शिवकुमार गुळवे, महालिंग कोरे व असंख्य ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# पार्श्वभूमी

दिनांक ७ जून २०१८ गुरुवार

गंमत भंडारी

ई-पेपर : www.parshvbhumi.com

L/Beed/52/2015-17


# नैतिकतेने नौकरी केल्यास कमी पगारातही सुखाचा संसार फुलवता येतो-डॉ.महेश गोलेकर

खर्डा,दि.६(प्रतिनिधी):- वाहतुक नियंत्रक श्री.सुनिल साळुंके यांच्या खर्डा ग्रामस्थांच्या वतीने आयोजित सेवापुर्ती समारंभ कार्यक्रमात छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी वरील उद्गार काढले.

पुढे बोलतांना त्यांनी एस.टी.कर्मचारी अत्यंत कमी पगारात नौकरी करीत असल्याचा उल्लेख केला. परंतू हीच नौकरी साळुंके यांनी नैतिकतने केल्यामुळे त्यांना कुठेही वेतन कमी पडले नाही. स्वतःच्या गावामध्ये गेली अनेक वर्षापासून वाहतुक नियंत्रक म्हणून का करत असताना समाजकार्याचे भान ठेवुन चौंडेश्वरी नवरात्र मंडळच्या माध्यमातुन गावामध्ये अनेक समाजउपयोगी उपक्रमांचे आयोजन करुन समाजकार्यामध्ये अग्रेसर असल्याचे दाखवुन दिचले. या प्रसंगी अनेक राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांना राजकारणात येण्याचे निमंत्रण दिले. परंतु राजकारणापासुन दुर राहुनच खरी समाजसेवा करता येते असे सांगुन विनम्रपणे नकार दिला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सिताराम गडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांच्या शुभहस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देवुन सपत्नीक सत्कार करण्यात आला.याप्रसंगी जामखेड आगारप्रमुख महादेव सिरसाण वाहतुक निरक्षक दिपक पवार, कामगार संघटनेचे बाबासाहेब चितळे, सचिव मासाळ तसेच खर्डा गावचे सरपंच संजय गोपाळघरे, पंचायत समिती सदस्य रविदादा सुरवसे, पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर, सरपंच शिवकुमार गुळवे, महालिंग कोरे व असंख्य ग्रामस्थांची उपस्थिती होती.

लोकमत
# हॅलो बीड
औरंगाबाद, बुधवार, २० जून २०१८

## श्रीसंत गजानन कॉलेज उपप्राचार्यपदी जाधव

बीड : येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्रीसंत गजानन महाविद्यालय उपप्राचार्यपपदी भूगोल विभागप्रमुख प्रा. शिवानंद जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. संस्था सचिव डॉ. महेश गोलेकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या नियुक्तीचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे व प्राध्यापकांनी स्वागत केले.

सायं. दैनिक बीड

# रिपोर्टर

संपादक : शेख तय्यब

बुधवार, दि. ६ जून २०१८ R.N.I. No.59885-93 R.No.L/13/STS/BEED/2018-20

## श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचा ९८ टक्के निकाल

बीड (रिपोर्टर):- येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलीत श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातील विज्ञान विभागाचा निकाल ९८ टक्के लागला आहे. प्रवेशीत झालेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ५० विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ०३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल ७२ टक्के तर कला शाखेचा निकाल ६५ टक्के लागला आहे.

तसेच वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेमध्ये महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये कु. मेंगडे तनया भारत ५४७ कु.क्रांती जाधव ५३५ तर कु. ऋतुजा घाडे ५१६ गुण घेवुन वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरल्या आहेत. महाविद्यालयात चालविण्यात येणाऱ्या एल.एल.टी. इलेक्ट्रानिक्स टेक्नॉलाजी सप्लाय अॅण्ड चैन मॅनेजमेंट या व्यवसाय अभ्यासक्रमामुळे तसेच विज्ञान व कला शाखेमुळे खर्डा पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांचा या महाविद्यालयाकडे ओढा वाढला असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके यांनी गुणवंताचे अभिनंदन करुन आवाहन केले आहे.

झुंजार नेता

हाराष्ट्र ■ शुक्रवार दि.१३ जुलै २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 20

# खऱ्या गरजवंतांसाठी रक्त उपलब्ध करून देणार - डॉ.गोलेकर

बीड, दि.१२ (प्रतिनिधी) :- येथील राष्ट्रवादी डॉक्टर्स सेलचे अध्यक्ष दलित, मित्र डॉ. महेश गोलेकर यांनी गरीब व खऱ्या अर्थाने गरजवंतांसाठी रक्त उलपब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. वरील निर्णय एका जाहीर पत्रकाद्वारे त्यांनी जाहीर केलेला आहे.

पत्रकात त्यांनी म्हटले आहे की ज्यांना खरोखरच आपल्या नातेवाईकांसाठी किंवा स्वत:साठी रक्त उपलब्ध करून देण्याचा कोणताही पर्याय उपलब्ध नसेल, केवळ अशा रूग्णासाठीच ते स्वत: शासकीय जिल्हा रूग्णालयाचे कार्ड देऊन रक्त उपलब्ध करून देणार आहेत.

यापुर्वी ही त्यांनी प्राचार्य डॉ. अरूण भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे गेले तीस वर्षे ही सेवा उपलब्ध करून दिलेली आहे व आता श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, खर्डा या संस्थेच्या माध्यमातुन ही सेवा देण्याचा त्यांनी निर्णय घेतलेला आहे. गरजवंतांनी डॉ. महेश गोलेकर यांचा मोबाईल नं. ९९२२३३४६३४ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. डॉ. सचिन वारे यांच्या आयुष हॉस्पिटलमध्ये कार्ड दिले जाईल.

बीडच्या
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
शुक्रवार दि.१३ जुलै २०१८ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMAR

## खऱ्या गरजवंतांसाठी रक्त उपलब्ध करून देणार -डॉ. महेश गोलेकर

**बीड । वार्ताहर**

येथील राष्ट्रवादी डॉक्टर्स सेलचे अध्यक्ष, दलित मित्र डॉ. महेश गोलेकर यांनी गरीब व खऱ्या अर्थाने गरजवंतांसाठी रक्त उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. वरील निर्णय एका जाहीर पत्रकाद्वारे त्यांनी जाहीर केलेला आहे. वरील जाहीर पत्रकात त्यांनी म्हटले आहे की ज्यांना खरोखरच आपल्या नातेवाईकांसाठी किंवा स्वत:साठी रक्त उपलब्ध करून देण्याचा कोणताही पर्याय उपलब्द नसेल. केवळ अशा रूग्णासाठीच ते स्वत: शासकीय जिल्हा रूग्णालयाचे कार्ड देऊन रक्त उपलब्ध करून देणार आहेत.

यापुर्वीही त्यांनी प्राचार्य डॉ. अरूण भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा य ेजनेद्वारे गेले तीस वर्षे ही सेवा उपलब्ध करून दिलेली आहे. व आता श्री. छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, खर्डा या संस्थेच्या माध्यमातून ही सेवा देण्याचा त्यांनी निर्णय घेतलेला आहे. गरजवतांनी डॉ. महेश गोलेकर याचा मोबाईल नं. ९९२२३३४६३४ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. डॉ. स चिन वारे यांच्या आयुष हॉस्पीटलमध्ये कार्ड दिले जाईल.

अकोला येथून प्रसिद्ध  SakalNews  @esakalupdate  Call Center : 9225800800

www.esakal.com

सकाळ

• अग्रलेख : नागपरातील 'नाणार'चे न-नाट्य!  किंमत ₹ ४

सकाळ

शुक्रवार, १३ जुलै २०१८ | ४

## संत गजानन महाविद्यालयात लोकसंख्या दिन

खर्डा, ता. १२ : येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. या वेळी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मोहन गुळवे होते. प्रमुख पाहुणे के. बी. वायकर होते. प्रा. नकुल खवले यांनी सूत्रसंचालन, तर भूगोल विभागप्रमुख प्रा. शिवानंद जाधव यांनी आभार मानले.

पार्श्वभूमी

१ दिनांक १५ जुलै २०१८ रविवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no

## छत्रपती सहकारी पतसंस्थे मार्फत वृक्षारोपन

खर्डा दि.१४ (प्रतिनिधी)– श्री छत्रपती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. खर्डा या पतसंस्थेमार्फत जामखेड येथील सहकारी संस्थेचे उपलेखापरिक्षक स.र.चुंबळकर व पतसंस्थेचे सचिव प्रा.आदिनाथ खेडकर व पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ.महेश गोलेकर यांच्या हस्ते सोनेगाव रोडवरील गजानन महाराज मंदिर परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. मंदिर परिसरात उंबर, वड, पिंपळ या भारतीय वृक्षांची आवर्जुन लागवड करण्यात आली.

लोकमत
अहमदनगर
अहमदनगर, बुधवार, दि. १८ जुलै २०१८

# गजानन महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : संत गजानन महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

लहूड कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य कल्याण वायकर प्रमुख पाहुणे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

प्रा. वायकर यांनी लोकसंख्या ही राष्ट्राला ओझे नसून योग्य त्या प्रशिक्षणअभावी लोकसंख्या हा मोठा प्रश्न ठरते.

त्यामुळे युवकांना योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचे सांगितले. प्राचार्य गुळवे यांनी लोकसंख्या दिनाचे औचित्य सांगितले.

प्रा.नकुल खवले यांनी सूत्रसंचालन केले. भूगोल विभागप्रमुख प्रा.शिवानंद जाधव यांनी आभार मानले.

पार्श्वभूमी

दिनांक २८ जुलै २०१८ शनिवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no

## खर्डा येथे बालगोपाळांची वृक्षदिंडी

खर्डा,दि. २७(प्रतिनिधी):– येथील सेंट मदर तेरेसा किलबील इंग्लीश स्कुल खर्डा, येथील प्रसिद्ध सितारामगडावर काढण्यात आली. या दिंडीमध्ये किलबील इंग्लीश स्कुलचे विद्यार्थी पांडुरंग रुक्मीणी कृष्ण अशा विविध रुपात सहभागी झाले होते. या दिंडीमध्ये वृक्षारोपन, लेकचवाचवा, पाणी अडवा पाणी जिरवा असे समाजप्रबोधनपर फलक विद्यार्थ्यांनी प्रदर्शीत केले. या दिंडीची कल्प निर्मिती प्राचार्य लता पवार व वर्गशिक्षका पुनम गायकवाड यांनी केले.

बीडचा
लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
शनिवार दि.४ ऑगस्ट २०१८ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMAR

# श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयास क्रॉप सायन्स विषयास मान्यता-डॉ.गोलेकर

खर्डा । वार्ताहर

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयास क्रॉप सायन्स या विषयास नुकतीच मान्यता मिळाल्याचे पत्र महाविद्यालयास मिळाले असल्याचे संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी कळविले आहे. तरी याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेवून लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य खेडकर किरण यांनी केले आहे.

या महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील बव्हंशी विद्यार्थी व पालक यांच्या मागणीनुसार संस्थेने या विषयाच्या मान्यतेसाठी प्रयत्न केले व त्यास यश आले आहे. नाशिक विभागामध्ये व जामखेड तालुक्यामध्ये एकमेव शासनाची मान्यता असलेला हा विषय आहे. हा विषय प्रात्यक्षिक अभिमुख असल्याने तो २०० गुणांचा असून यामध्ये प्रात्यक्षिकासाठी १२० गुण व लेखी परिक्षेसाठी ८० गुण आहेत. त्यामुळे भाषेसारख्या एक कठीण विषय कमी होतो. तसेच या विषयामुळे १२ वी च्या एकूण गुणांमध्ये टक्केवारी वाढण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शेतीकडे ओढा असणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.एस्सी ॲग्रीकल्चरसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे वाढीव गुण मिळतात व मेडिकलसाठी प्रवेश इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना पीसीबी ग्रुपसाठी देखील याचा चांगला लाभ होतो. तरी सीबीएसई, आसीएसई व राज्य परिक्षा मंडळातून एस.एस.सी परिक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांनी हा विषय निवडून उपलब्ध झालेल्या या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या वतिने करण्यात आले आहे.

ावम न्युज पेपर एजन्सी & बुक स्टॉल
शिवराज पान सेंटर जवळ,
व्हाणे बिल्डींग, शिवाजीनगर, बीड
मो.7775813306,9096180038

पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक ६ ऑगस्ट २०१८ सोमवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no

## श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयास क्रॉप सायन्स विषयास मान्यता-डॉ.गोलेकर

खर्डा दि.५ (प्रतिनिधी)- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयास क्रॉप सायन्स या विषयास नुकतीच मान्यता मिळाल्याचे पत्र महाविद्यालयास मिळाले असल्याचे संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी कळविले आहे. तरी याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेवुन लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य खेडकर किरण यांनी केले आहे.

या महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी व पालक यांच्या मागणीनुसार संस्थेने या विषयाच्या मान्यतेसाठी प्रयत्न केले व त्यास यश आले आहे. नाशिक विभागामध्ये व जामखेड तालुक्यामध्ये एकमेव शासनाची मान्यता असलेला हा विषय आहे. हा विषय प्रात्यक्षिक अभिमुख असल्याने तो २०० गुणांचा असुन यामध्ये प्रात्याक्षिक साठी १२० गुण व लेखी परीक्षेसाठी ८० गुण आहेत. त्यामुळे भाषेसारख्या एक कठीण विषय कमी होतो. तसेच या विषयामुळे १२ वी च्या एकुण गुणांमध्ये टक्केवारी वाढण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शेतीकडे ओढा असणाऱ्या विद्यार्थ्यांना बी.एस्सी.ॲग्रीकल्चरसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे वाढीव गुण मिळतात व मेडीकलसाठी प्रवेश इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना पी.सी.बी.ग्रुपसाठी देखील याचा चांगला लाभ होतो. तरी सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई, व राज्य परीक्षा मंडळातून एस.एस.सी.परीक्षा पास झालेल्या

झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ सोमवार दि. ६ ऑगस्ट २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-2


# श्री.छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयास क्रॉप सायन्स विषयास मान्यता- डॉ.गोलेकर

खर्डा, दि.५ (प्रतिनिधी) :- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंत्रडळ खर्डा संचलीत श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयात क्रॉप सायन्स या विषयास नुकतीच मान्यता मिळाल्याचे पत्र महाविद्यालयास मिळाले असल्याचे संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी कळविले आहे. तरी याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांन प्रवेश घेवुन लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य खेडकर किरण यांनी केले आहे.

या महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील बऱ्हंशी विद्यार्थी व पालक यांच्या मागणीनुसार संस्थेने या विषयाच्या मान्यतेसाठी प्रयत्न केले व त्यास यश आले आहे. नाशिक विभागामध्ये व जामखेड तालुक्यामध्ये एकमेव शासनाची मान्यता असलेला हा विषय आहे. हा विषय प्रात्यक्षीक अभिमुख असल्याने तो २०० गुणांचा असुन यामध्ये प्रात्यक्षीकसाठी १२० गुण व लेखी परीक्षेसाठी ८० गुण आहेत. त्यामुळे भाषेसारख्या एक कठीण विषय कमी होतो. तसेच या विषयामुळे १२ वी च्या एकुण गुणांमध्ये टक्केवारी वाढण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शेतीकडे ओढा असणाऱ्या विद्यार्थ्यांना बी. एस्सी. ऍग्रीकल्चरसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे वाढीव गुण मिळतात व मेडीकलसाठी प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना पी. सी. बी. ग्रुप साठी देखील याचा चांगला लाभ होतो. तरी सी. बी. एस. ई., आय. सी. एस. ई. व राज्य परीक्षा मंडळातुन एस. एस. सी. परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना हा विषय निवडुन उपलब्ध झालेल्या या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

www.esakal.com

सकाळ

• पुणे, ★ गुरुवार, ९ ऑगस्ट २०१८

## खर्डा येथे योग स्पर्धा

खर्डा, ता. ८ : श्री छत्रपती आरोग्य व शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्रीसंत गजानन महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन योग स्पर्धेचे उद्‌घाटन सरपंच संजय गोपाळघरे यांच्या हस्ते झाले.

संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर, विजयसिंह गोलेकर, प्राचार्य डॉ. मोहन गुळवे, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्रा. रवींद्र शिर्के, वैशाली थोरात आदी या वेळी उपस्थित होते. स्पर्धेत संगमनेर कॉलेजने सांघिक गटात प्रथम क्रमांक मिळविला. मुलांच्या गटात सागर कोटकर, प्रवीण आंधळे व अमोल भालेराव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. मुलींच्या गटात कांचन ढोणे प्रथम आली.

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
रविवार दि.१९ ऑगस्ट २०१८ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMAR/

## श्री छत्रपती शिक्षण संकुलात कब्बडी-व्हॉलीबॉल स्पर्धा

**खर्डा । वार्ताहर**

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. मुख्य ध्वजारोहन सोहळा विविध कार्यकारी विकास सोसायटीचे चेअरमन चंद्रकांतदादा गोलेकर यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खर्डा येथील प्रसिद्ध व्यापारी जवाहरलाल शहा, नंदुशेठ लद्दड, विविध कार्यकारी विकास सोसायटीचे व्हॉ.चेअरमन श्रीकांत लोखंडे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विजयसिंह गोलेकरर यांच्या हस्ते कबड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी उपस्थित विद्यार्थी खेळाडूंचे कौतुक करत विजयी संघास बक्षीस प्रदान केले. महाविद्यालयातील विविध विभागांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकांचे विमोचनही प्राचार्य डॉ.मोहन गुळवे व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. खर्डा शहरातील प्रतिष्ठित डॉक्टर विवेक दिंडोरे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शारीरिक शिक्षण संचालक प्रा.राजु म्हेत्रे यांनी केले.

पार्श्वभूमी
गंमत भंडारी
दिनांक २० ऑगस्ट २०१८ सोमवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.n

# श्री छत्रपती शिक्षण संकुलात कबड्डी-व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न

खर्डा(प्रतिनिधी)- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन ध्वजारोहन सोहळा चंद्रकांत दादा गोलेकर यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खर्डा येथील प्रसिध्द व्यापारी जवाहरलाल शहा, नंदूशेठ लद्दड, व्हॉ.चेअरमन श्रीकांत लोखंडे, विजयसिंह गोलेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर यांच्या हस्ते कबड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन ध्वजारोहन सोहळा चंद्रकांत दादा गोलेकर यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी डॉ.महेश गोलेकर यांनी उपस्थित विद्यार्थी खेळाडूंचे कौतुक करत विजयी संघास बक्षीस प्रदान केले. खर्डा शहरातील प्रतिष्ठीत डॉक्टर डॉ.विवेक दिंडोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्रा.राजु म्हेत्रे यांनी केले.

# झुंजार नेता

हाराष्ट्र ■ शनिवार दि.२५ ऑगस्ट २०१८ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-


## विजयसिंह गोलेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा

खर्डा, दि. २६ (प्रतिनिधी):- श्री कल्याणी शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा व विजयसिंह गोलेकर मित्रमंडळाच्या [illegible] खर्डा येथे श्री संत गजानन महाविद्यालयात विजयसिंह गोलेकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला.



या सोहळ्यामध्ये आरोग्य तपासणी शिबीर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार [illegible] इ. उपक्रम राबविण्यात आले. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे खर्डा गावचे सरपंच संजय आप्पा गोपाळघरे यांनी विजयसिंह गोलेकर यांनी खर्डा गावच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. [illegible] यांनी खर्डा येथील विविध शैक्षणिक उपक्रमातील विजयसिंह गोलेकर यांच्या सहभागाबद्दल गौरवोद्गार काढले. याप्रसंगी विजयसिंह गोलेकर [illegible] कोरे, पत्रकार संतोष थोरात, खर्डा विविध विकास सोसायटीचे संचालक शिवाजीराव भोसले, छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या अभिष्टचिंतन सोहळ्यामध्ये खर्डा गावातील [illegible] उपस्थित होते. या सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. शिवानंद जाधव यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. [illegible] खेडकर यांनी केले.

पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक ३ सप्टेंबर २०१८ सोमवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no

# क्रिडा क्षेत्रातून सर्वांगीण विकास शक्य–प्राचार्य डॉ.मोहन गुळवे

खर्डा दि.२ (प्रतिनिधी ) – श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्रीसंत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट हा जन्मदिवस राष्ट्रीय क्रिडा दिन म्हणुन साजरा करण्यात आला.

या निमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी क्रिडा क्षेत्रातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनेक पुरक व्यवसायात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात. या विविध संधीचा फायदा घेण्याचे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना केले. खेळाच्या माध्यमातून व्यक्तीच्या शारिरीक, मानसिक, आर्थिक विकास होतो. विविध खेळ हे सांघीक व राष्ट्रीय भावना निर्माण करण्यास पोषक वातावरण निर्माण करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याचे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षक संचालक प्रा.राजु म्हेत्रे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर आभार प्रा.नकुल खवले यांनी मानले

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
शनिवार दि.८ सप्टेंबर २०१८ Reg.No.L/Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMAR

## खर्डा येथे केरळ पुरग्रस्तांसाठी मदतफेरी

खर्डा । वार्ताहर

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा यांच्या वतिने केरळ पुरग्रस्तांसाठी मदत निधी रॅली काढण्यात आली. या रॅलीसाठी संस्थेच्या श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आपला सक्रीय सहभाग नोंदवला.

या मदत फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी वंदे मातरम्, भारत माता की जय, घराघरातून आता आवाज निर्माण करु केरळ आज. मदत करा, मदत करा पुरग्रस्तांना मदत करा अशा घोषणा देत संपूर्ण खर्डा शहरात केरळच्या नवनिर्माणासाठी मदत फेरी काढली. या मदतफेरीला खर्डा गावात उत्स्फुर्त व उदंड प्रतिसाद मिळाला. या मदतफेरीतून सर्व भारतीय माझे बांधव आहेत व या बांधवासाठी मदत करणे आपले कर्तव्य आहे असे आवाहन प्राचार्य डॉ.मोहन मुळवे व प्राचार्य लक्ष्मणराव घोडके यांनी केले. या मदतफेरीद्वारे १६४११/-रुपये इतकी मदत केरळ मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमाचे खर्डा ग्रामस्थांनी व संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी कौतुक केले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.शेख मोहसीन, डॉ.भारत मेंगडे व विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ.ओंकार खिस्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

पार्श्वभूमी

दिनांक ९ सप्टेंबर २०१८ रविवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | L/Beed/52/2015-17 | RN

# खर्डा येथून केरळ मदत
# पुरग्रस्तांसाठी उत्स्फुर्त प्रतिसाद

खर्डा (प्रतिनिधी)- श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा, यांच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी मदत निधी रॅली काढण्यात आली. या रॅलीसाठी संस्थेच्या श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. या मदत फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी वंदे मातरम्, भारत माता कि जय, घराघरातून आला आवाज निर्माण करू केरळ आज मदत करा मदत करा. पुरग्रस्तांना मदत करा अशा घोषणा देत संपूर्ण खर्डा शहरात केरळच्या नवनिर्माणासाठी मदत फेरी काढली. या मदत फेरीला खर्डा गावात उत्स्फुर्त व उदंड प्रतिसाद मिळाला. या मदत फेरीतून सर्व भारतीय माझे बांधव आहेत व या बांधवासाठी मदत करणे आपले कर्तव्य आहे असे आवाहन प्राचार्य डॉ.मोहन गुळवे व प्राचार्य लक्ष्मणराव घोडके यांनी केले. या मदत फेरीद्वारे १६४१५/- रू.इतकी मदत केरळ मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमाचे खर्डा ग्रामस्थांनी व संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी कौतुक केले.

www.esakal.com
सकाळ



**स्वार्थी लोकांचा मेळावा**

महाआघाडी हा स्वार्थी लोकांचा मेळावा आहे,'' असा तिखट हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज चढविला.

II

...वार, १० सप्टेंबर २०१८

● अग्रलेख : दगड आणि दऱ्या ● पहाटपावलं : सॉरी म्हणण्याचा धडा

## केरळ पूरग्रस्तांसाठी खर्डा येथे मदतफेरी

**खर्डा :** केरळ पूरग्रस्तांसाठी श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या वतीने मदत निधी फेरी काढण्यात आली. त्यात श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मदतफेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राचार्य डॉ. मोहन गुळवे व घोडके यांनी मदतीचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी १६ हजार ४१५ रुपये मदत मुख्यमंत्री साहाय्यता निधीस सुपूर्द केली. संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मोहसीन शेख, डॉ. भारत मेंगडे व विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. ओंकार खिस्ते यांनी यासाठी परिश्रम घेतले.

महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ३.००

अहमदनगर, सोमवार, दि. १० सप्टेंबर २०१८

# केरळ पूरग्रस्तांच्या मदतीसाठी फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : येथील श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने केरळ राज्याचे मदत व पुनर्वसन होण्यासाठी मदत गोळा करण्यात आली

केरळ राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुराने अतोनात नुकसान झाले. त्या राज्याला मदत करण्यासाठी सामाजिक बांधिलकी व देशसेवा म्हणून विद्यार्थ्यांनी व शिक्षक कर्मचारी यांनी खर्डा शहरात मदत फेरी काढली.

मदत बॉक्स घेऊन घोषणा देत शहरातील दुकानदार, पादचारी, छोटे मोठे व्यावसायिक, सामान्य नागरिकांना पूरग्रस्तांसाठी मदत करण्यासाठी आवाहन करत शहरातून मदत फेरी काढली. यातून सोळा हजार चारशे पंचवीस रुपये एवढा निधी गोळा झाला.

जमा झालेली रक्कम सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे जमा करणार असल्याचे श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके व श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळ्वे यांनी सांगितले.

डॉ. भारत मेंगडे, प्रा. डॉ. ओंकार खिस्ते, प्रा. धनंजय जवळेकर, प्रा. राजू म्हेत्रे, प्रा संजय होळंबे, नकुल खवले, प्रा. महेश बजगुडे, मोहसीन शेख, वैशाली कुलकर्णी, ऋषिकेश नाईकवाडे यांच्यासह विद्यालयाचे कर्मचारी, शिक्षक सहभागी झाले होते.

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १०+४+४ = १८, किंमत: ₹ ४.००
अहमदनगर, गुरुवार, दि. २७ सप्टेंबर २०१८

लोकमत
www.lokmat.com

# जवळ्याचा नवयुग संघ विजेता

## जामखेड तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा : खर्ड्याचे गजानन महाविद्यालय उपविजेते

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** जामखेड तालुक्यातील खर्डा येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत जवळा येथील नवयुग कबड्डी संघाने विजेतेपद पटकाविले. खर्डा येथील संत गजानन महाविद्यालय संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत जवळा येथील नवयुग कबड्डी संघाने विजेतेपद पटकाविले.

नेहरू युवा केंद्र, श्री संत गजानन महाविद्यालय यांच्या वतीने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्या वैशाली थोरात यांच्या हस्ते झाले होते. प्रा. डॉ. मोहन गुळवे, प्रा. लक्ष्मण घोडके, माजी पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर, नेहरू युवा केंद्र तालुका समन्वयक शशिकांत कोळपकर, प्रेरणा युवा फाउंडेशनचे संचालक गणेश टाळके आदी उपस्थित होते. छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर रात्री उशिरापर्यंत कबड्डी स्पर्धा सुरु होत्या.

स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे बक्षीस सरपंच संजय गोपाळघरे, द्वितीय शिवतेज मेडिकल, तृतीय डॉ. मोहन गुळवे यांच्यातर्फे देण्यात आले. प्रथम नवयुग कबड्डी संघ जवळा, द्वितीय संत गजानन महाविद्यालय खर्डा, तृतीय बक्षीस छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय खर्डा यांनी पटकावले.

बक्षीस वितरण कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्या वैशाली थोरात, जातेगावच्या सरपंच दीपाली गर्जे, प्रा. लक्ष्मण घोडके आदी प्रमुख उपस्थित होते.

सूत्रसंचालन व प्रास्तविक प्रा. शिवानंद जाधव यांनी केले. प्रा. राजू म्हेत्रे यांनी आभार मानले.

सायं. दैनिक बीड

# रिपोर्टर

संपादक : शेख तय्यब R.N.I. No.59885-93 R.No.L/13/STS/BEED/2018-20

राष्ट्र वर्ष २६ वे अंक ४१ सोमवार, दि. २४ सप्टेंबर २०१८ पोस्टल दि. २५ सप्टेंबर २०१८ पाने ८ किंमत ३ ₹



गजानन सहकारी बँकेचे संचालक प्राचार्य मन्मथअप्पा शिवलिंगअप्पा हेरकर व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्कार करताना बीड राष्ट्रवादी डॉक्टर्स सेलचे अध्यक्ष तथा दलितमित्र डॉ.महेश गोलेकर वरील छायाचित्रात दिसत आहेत

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

१ दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रविवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.n


## सुदृढ आरोग्य हीच खरी यशाची किल्ली- डॉ. महेश गोलेकर

खर्डा दि.२९ (प्रतिनिधी)- जामखेड तालुक्यातील श्री संत गजानन महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे च्या बहिशाल शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमालेचे २४ व २६ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले त्यावेळी बोलताना महिला महाविद्यालयाचे निवृत्त शारीरिक शिक्षक रतिलाल मेहर यांनी मार्गदर्शन केले तर यावेळी बोलताना शब्द आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे मत डॉक्टर महेश गोलेकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर महेश गोलेकर हे होते यावेळी प्रा मेहर यांनी प्रात्यक्षिकाद्वारे ज्येष्ठ नागरिकांना योग व प्राणायाम चे महत्व सांगितले. या कार्यक्रमाला खर्डा गावातील ज्येष्ठ नागरिकांनी प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय होळंबे यांनी केले तर प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी आभार मानले.

# पार्श्वभूमी

दिनांक १ ऑक्टोबर २०१८ सोमवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.no


## राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलच्या वतीने सर्वरोग निदान शिबीर संपन्न

बीड दि. ३० (प्रतिनिधी) :- राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलच्या वतीने खर्डा येथे मोफत सर्वरोग निदान संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमामध्ये बोलतांना राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ.महेश गोलेकर यांनी डॉक्टर्स सेलच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक रोगनिदाने शिबीरे, हिमोग्लोबीन तपासणी शिबीरे व रक्तदान शिबीर व रक्तदान शिबीर विविध ठिकाणी घेतली असल्याचे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच आपत्तीच्या वेळी जनसामान्याच्या पाठीशी उभा राहणारा पक्ष असुन जनसामान्यात या पक्षाची प्रतिमा उंचावत असल्याचे सांगितले.

या सर्वरोग निदान शिबीराचे उद्घाटन खर्डा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष संतोष लष्करे यांनी केले. त्यांनीही बोलतांना राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष अनेक सामाजिक उपक्रमाद्वारे जनसामान्यात पोहचत असल्याचे सांगितले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर यांनीही मार्गदर्शन केले. या शिबीराचा लाभ खर्डा पंचक्रोशातील ३६० रूग्णांनी घेतला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. डॉ.सेलच्या डॉक्टरांनी रूग्णांची तपासणी केली.

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १०+४+४ = १८, किंमत: ₹ ४.00

अहमदनगर, मंगळवार, दि. २ ऑक्टोबर २०१८







खर्डा येथील सर्वरोग तपासणी शिबिरात रुग्णांची तपासणी करताना डॉक्टर.

# खर्ड्यातील शिबिरात ३६० रुग्णांची तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

खर्डा : खर्डा (ता.जामखेड) येथील पारधी समाजाच्या वस्तीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस डॉक्टर्स सेलच्या वतीने घेण्यात आलेल्या मोफत सर्वरोग निदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ३६० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादीचे संतोष लष्करे यांच्या हस्ते करण्यात आले. माजी पंचायत समिती सदस्य विजयसिंह गोलेकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सर्व रोग निदान तपासणीबरोबरच हिमोग्लोबीन, रक्तगट तपासण्या करण्यात आल्या. यावेळी डॉ. महेश गोलेकर, डॉ. भारत मेंगडे, प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्रा. अनिल बारटक्के, प्रा. वैशाली कुलकर्णी आदी उपस्थित होते.

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
२५८ ■ सोमवार दि. ८ ऑक्टोबर २०१८ ■ Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHM

## स्व.केशर काकू बीड जिल्ह्याच्या शिल्पकार-डॉ.महेश गोलेकर

**बीड । वार्ताहर**

श्री.छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या प्रांगणात मराठवाड्यातील महिला लोकनेत्या श्रीमती केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी या खंबीर नेतृत्वाच्या आठवणींना उजाळा दिला. ज्या काळात स्त्रिया केवळ चूल आणि मूल याच क्षेत्रात असत. त्या काळात राजुरीच्या सरपंच पदापासून झेप घेत बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्याचे १५ वर्ष नेतृत्व दिल्लीमध्ये करत ऊसतोड करणाऱ्या मजुरांच्या समस्या त्यांनी सोडवल्या.

संपूर्ण जिल्हाभर शैक्षणिक संस्थाचे जो उभारत गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे उघडे करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. तसेच बीडच्या विकासात हातभार लावून आकाशवाणी व दूरदर्शन केंद्राची स्थापना त्यांच्यामुळेच शक्य झाली तर बीडच्या रेल्वेचा पाया केशरकाकूंनी रचला असे प्रतिपादन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर केले. याप्रसंगी छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, कर्मचाऱ्यांची व विद्यार्थ्यांची शहरातील प्रतिष्ठितांची उपस्थिती होती.

सायं. दैनिक बीड

# रिपोर्टर

संपादक : शेख तय्यब    R.N.I. No.59885-93  R.No.L/13/STS/BEED/2018-20

बीड । महाराष्ट्र  वर्ष २६ वे अंक ५५  सोमवार, दि. ८ ऑक्टोबर २०१८  पोस्टल दि. ९ ऑक्टोबर २०१८  पाने ८  किंमत

## स्व. केशरकाकू बीड जिल्ह्याच्या शिल्पकार - डॉ. महेश गोलेकर



बीड (रिपोर्टर) श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या प्रांगणात मराठवाड्यातील महिला लोकनेत्या श्रीमती केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी या खंबीर नेतृत्वाच्या आठवणींना उजाळा दिला. ज्या काळात स्त्रिया केवळ चूल आणि मूल याच क्षेत्रात असत त्या काळात राजुरीच्या सरपंच पदापासून झेप घेत बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्याचे १५ वर्षे नेतृत्व दिल्लीमध्ये करत ऊसतोड करणाऱ्या मजुरांच्या समस्या त्यांनी सोडवल्या. संपूर्ण जिल्हाभर शैक्षणिक संस्थाचे जाळे उभारत गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे उघडे करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. तसेच बीडच्या विकासात हातभार लावून आकाशवाणी व दूरदर्शन केंद्राची स्थापना त्यांच्यामुळेच शक्य झाली तर बीडच्या रेल्वेचा पाया केशरकाकूंनी रचला असे प्रतिपादन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर केले. याप्रसंगी श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, कर्मचाऱ्यांची व विद्यार्थ्यांची शहरातील प्रतिष्ठीतांची उपस्थिती होती.

झुंजार नेता

हाराष्ट्र ■ शुक्रवार दि.१२ ऑक्टोबर २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-2

LIBRARY BOOK NO.

# स्व. केशर काकू बीड जिल्ह्याच्या शिल्पकार- डॉ.महेश गोलेकर

बीड, दि.११ (प्रतिनिधी):- श्री.छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या प्रांगणात मराठवाड्यातील महिला लोकनेत्या श्रीमती केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी या खंबीर नेतृत्वाच्या आठवणींना उजाळा दिला. ज्या काळात स्त्रिया केवळ चूल आणि मूल याच क्षेत्रात असत त्याकाळात राजूरीच्या सरपंच पदापासून झेप घेत बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्याचे १५ वर्ष नेतृत्व दिल्लीमध्ये करत उसतोड करणाऱ्या मजुरांच्या समस्या त्यांनी सोडवल्या. संपूर्ण जिल्हाभर शैक्षणिक संस्थाचे जाळे उभारत गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे उघडे करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. तसेच बीडच्या विकासात हातभार लावून आकाशवाणी व दूरदर्शन केंद्राची स्थापना त्यांच्यामुळेच शक्य झाली तर बीडच्या रेल्वेचा पाया केशरकाकूंनी रचला असे प्रतिपादन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांनसमोर केले. याप्रसंगी श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, कर्मचाऱ्यांची व विद्यार्थ्यांची शहरातील प्रतिष्ठितांची उपस्थिती होती.



# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक १० डिसेंबर २०१८ सोमवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.n


## आ.जयदत्त क्षीरसागरांमुळेच बीड शहराचा विकास-डॉ. गोलेकर

बीड दि.०९(प्रतिनिधी):- आ.जयदत्त क्षीरसागरांनी नगर परिषदेच्या माध्यमातून शहाराचा खऱ्या अर्थाने चेहरा मोहराच बदलला असे मत दलित मित्र व बीड राष्ट्रवादी सेलेचे अध्यक्ष डॉ.महेश गोलेकर यांनी आयोजित रक्तगट तपासणी शिबीरात काढले पुढे बोलतांना म्हणाले की, यासाठी त्यांनी मंत्री असतांना राज्य व केंद्र शासनाचा मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळेच नाटयगृह, नगर परिक्षदेंची इमारत, न्यायालयाची सुंदर व भव्य वास्तू उभ्या राहू शकल्या. डॉ.महेश गोलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजाजन महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भव्य अशा मोफत रक्तगट तपासणी शिबीराचे खर्डा येथे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एम.एलटी विभागचे प्रमुख डॉ.भारत मेंगडे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी केली. संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी आमदार जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त आपल्या खर्डा येथील शैक्षणिक संकुलामध्ये रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करून सामाजिक कार्याची प्रचीती दिली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण घोडके, प्राचार्य माहेन गुळवे, शिक्षक वृंद व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## महामानवाच्या परितर्वनाचा पाईक होणे हिच खरी आदरांजली

खर्डा दि.०९(प्रतिनिधी):- संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालाच्या प्रांगणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महपरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा घेण्यात आली. या अभिवादन सभेचे अध्यक्ष दलितमित्र डॉ.महेश गोलेकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यास व स्मृतीस उजाळा दिला. या महामानवाच्या संघर्षामुळे परिवर्तनाची पहाट या देशात उगवली. देशात सर्वच क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. आपणही या परिवर्तनाच्या प्रक्रियेचा घटक बनावे व पुरोगामी विचारांचा आदर्श अंगी बाणववा असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.मोहन गुळवे व प्राचार्य लक्ष्मण घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

सकाळ ८ गुरुवार, २० डिसेंबर २०१८

Today

# श्री संत गजानन महाविद्यालयात उद्यापासून राज्यस्तरीय चर्चासत्र

**जामखेड, ता. १९ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत येथील श्री संत गजानन महाविद्यालयात 'महाराष्ट्रातील शेतकरी कामगार चळवळीचा राजकीय इतिहास' या विषयावर दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन २१ व २२ डिसेंबर केले आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी सी. टी. बोरा महाविद्यालयाचे प्राचार्य के. सी. मोहिते असतील. या राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी विविध महाविद्यालयांतील विषयतज्ज्ञ, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. चर्चासत्रात शेतकरी कामगार चळवळीवर सांगोपांग चर्चा होणार आहे. त्यामुळे शेतकरी कामगारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी या चर्चासत्रातून निघालेले निष्कर्ष व सूचना महत्त्वाच्या ठरतील, अशी अपेक्षा संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी व्यक्त केली. या चर्चासत्राचा लाभ घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी केले.

झुंजार नेता
महाराष्ट्र ■ गुरुवार दि.२० डिसेंबर २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 20

# श्री संत गजानन महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन

बीड, दि.१९ (प्रतिनिधी) :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजना व श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत गजानन महाविद्यालयात शेतकरी कामगार चळवळींचा राजकीय इतिहास या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन दि. २१ व २२ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे.या राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी विविध महाविद्यालयातील विषयतज्ञ, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. शेतकरी कामगार चळवळीवर सांगोपांग विस्तृत चर्चा या चर्चासत्रात होणार असल्यामुळे शेतकरी कामगारांच्या विविध प्रश्नांचे सोडवणुक करण्यासाठी या चर्चासत्रातुन निघालेले निष्कर्ष व सुचना महत्वाच्या ठरतील अशी अपेक्षा संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी व्यक्त केली आहे. या राज्यस्तरीय चर्चासत्राचा लाभ घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी केले आहे.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत: ₹ ४.00
अहमदनगर, शुक्रवार, दि. २१ डिसेंबर २०१८

# खर्डा येथील महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** येथील श्री संत गजानन महाविद्यालयात २१ व २२ डिसेंबरला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत 'महाराष्ट्रातील शेतकरी कामगार चळवळीचा राजकीय इतिहास' या विषयावर दोन दिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी सांगितले.

शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब देशमुख यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्‌घाटन होणार आहे. सी. टी. बोरा महाविद्यालयाचे प्राचार्य के. सी. मोहिते अध्यक्षस्थानि असतील. या चर्चासत्रासाठी विविध महाविद्यालयातील विषयतज्ज्ञ, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

यावेळी शेतकरी कामगार चळवळीवर सांगोपांग चर्चा होणार आहे. शेतकरी कामगारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी या चर्चासत्रातून निघालेले निष्कर्ष व सूचना महत्त्वाच्या ठरतील, अशी अपेक्षा संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी व्यक्त केली आहे.

# पार्श्वभूमी

दिनांक २५ डिसेंबर २०१८ मंगळवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Re


## शेतकरी, कष्टकरी जागतिकीकरणाचे शिकार-प्रा.डॉ.आत्माराम शिंदे

बीड दि.२३(प्रतिनिधी)- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजना व श्री संत गजानन महाविद्यालयाच्या राज्यशासत्र व इतिहास विभागाच्यावतीने शेतकरी कामगार चळवळीचा राजकीय इतिहास‑ या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र दि.२१ व २२ डिसेंबर रोजी संपन्न झाले. या राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या राज्यशासत्र अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा.डॉ.काकासाहेब पोकळे यांच्या हस्ते झाले.

या चर्चासत्राचे अध्यक्ष श्री छत्रपती शिक्षण व आरोगय प्रसारक मंडळाचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी भूषविले. चर्चासत्राचे बीजभाषण स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.आत्मराम शिंदे यांनी केले. तर आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ.शिंदे यांनी जागतिकीक रणातून शेती व्यवस्थेला उभ्या राहणाऱ्या आव्हानांचा उहापोह केला. शेतकऱ्यांची स्वंयपूर्णता संपून भारतातील शेती ही जागतिकीकरणाची शिकार बनली आहे. स्वामीनाथन आयोगानूसार शेतीमालाला भाव मिळाल्यास कर्जमाफीची सरकारवर वेळ येणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले. या चर्चासत्रामध्ये आठ सत्रामध्ये संशोधक व विषयतज्ज्ञ प्राध्यापकांनी या विषयावर आपले विचार सादर केले. या चर्चासत्रासाठी ६० संशोधकांनी आपले लेख सादर केले. चर्चासत्रामध्ये विषयतज्ज्ञ म्हणून डॉ.राजदेव, डॉ.गिरमकर, डॉ.लावंड पी.एम डॉ.जे.एम बोचरे, डॉ.कृष्णा पाटील, यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्तावीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन गुळवे यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा.शिवानंद जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.नकुल खवले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.धनंजय जवळेकर यांनी दिला. या कार्यक्रमासाठी पुणे, औरंगाबाद, सोलापूर, नांदेड व कोल्हापूर, विद्यापीठ परीक्षेत्रातील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते.

ापूर । कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ४७००१/१९८८ । वर्ष : ३२ अंक : १२८ www.facebook.

लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.००

अहमदनगर, मंगळवार, दि. २५ डिसेंबर २०१८

# कामगार संघटना भांडवलशाहीमुळे मोडकळीस

## काकासाहेब पोकळे : गजानन महाविद्यालयात चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**खर्डा :** कामगार संघटना गुंडाकडे गेल्याचे चित्र निर्माण झाले आहे. कामगार संघटना भांडवलशाहीमुळे मोडकळीस आल्या. चळवळी कशा उभ्या करायच्या व मागण्या मान्य कशा करायच्या?, हे चळवळीचे खरे गमक आहे, असे प्रा. डॉ. काकासाहेब पोकळे यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संत गजानन महाविद्यालयाच्या वतीने 'महाराष्ट्रातील शेतकरी कामगार चळवळीचा राजकीय इतिहास' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते कामगार चळवळीचा आढावा घेताना बोलत होते. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे, श्री छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. महेश गोलेकर, प्रा. डॉ. आत्माराम शिंदे आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. पोकळे म्हणाले, चळवळीचे काम विकले गेले, तर चळवळ कमी होते. कामगार शेतकरी संघटनेच्या चळवळीची प्रमुख पाया हा समाज समाजवादी विचारसरणीवर टिकून आहे. विसाव्या शतकात चळवळ नामशेष होत चालली आहे, असे चित्र दिसून येते. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण हे 'खाउजा' धोरण स्वीकारल्यामुळे कामगारांवर बेरोजगारीची वेळ आली. संघटना असाव्यात, पण त्या विकल्या गेलेल्या नसाव्यात. संघटना वाढवायची असेल तर त्याकडे चिकित्सक म्हणून पाहिले तर चळवळ मोठी होते. चळवळीच्या अभ्यासकांनी चळवळीकडे चिकित्सक भावनेने पाहिल्यास निश्चित चळवळ मोठी होते. आधुनिक तंत्रज्ञान अस्तित्वात आले. एका बाजूला फायदा झाला व दुसऱ्या बाजूला मोठा तोटा झाला. कारखान्याचे उत्पादन वाढल्यामुळे मनुष्यबळ कमी लागल्यामुळे बेरोजगारी वाढ झाली. खाउजा धोरण स्वीकारल्यामुळे कामगार शेतकऱ्यांवर बेरोजगारीची वेळ आली. यावेळी प्रा. डॉ. आत्माराम शिंदे यांचे बीजभाषण झाले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे, संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनीही मते मांडली. प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शिवानंद जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नकुल खवले यांनी आभार मानले.

झुंजार नेता

महाराष्ट्र ■ शनिवार दि.२९ डिसेंबर २०१८ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2

# शेतकरी, कष्टकरी जागतिकीकरणाचे शिकार प्रा. डॉ. आत्माराम शिंदे

बीड, दि.२४ (प्रतिनिधी) :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजना व श्री संत महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व इतिहास विभागाच्या वतीने शेतकरी कामगार चळवळीचा राजकीय इतिहास या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र दि. २१ व २२ डिसेंबर रोजी संपन्न झाले. या राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. काकासाहेब पोकळे यांच्या हस्ते झाले.

या चर्चासत्राचे अध्यक्ष श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी भुषविले. चर्चासत्राचे बीजभाषण स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. आत्माराम शिंदे यांनी केले. आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ. शिंदे यांनी जागतिकीकरणातुन शेती व्यवस्थेला उभ्या राहणाऱ्या आव्हांनाचा उदापोह केला. शेती व शेतकऱ्यांची स्वयंपुर्णता संपुन भारतातील शेती ही जागतिकीकरणाची शिकार बनली आहे. स्वामीनाथन आयोगानुसार शेतमालाला भाव मिळाल्यास कर्जमाफीची सरकारवर वेळ येणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले. या चर्चासत्रामध्ये आठ सत्रामध्ये संशोधक व विषयतज्ज्ञ प्राध्यापकांनी या विषयावर आपले विचार सादर केले. यां चर्चासत्रासाठी ६० संशोधकांनी आपले लेख सादर केले. चर्चासत्रासाठी विषयतज्ज्ञ म्हणुन डॉ. राजदेव, डॉ. गिरमकर, डॉ. लावंड पी. एम., डॉ. जे. एम. बोचरे, डॉ. कृष्णा पाटील यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन गुळवे यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. शिवानंद जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. नकुल खवले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. धनंजय जवळेकर यांनी दिला. या कार्यक्रमासाठी पुणे, औरंगाबाद, नांदेड, सोलापुर, व कोल्हापुर विद्यापीठ परीक्षेत्रातील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य लाभले.

**हरवले आहे**

श्रीमती पल्लवी दत्तात्रय निराळे या नावाचे आधार कार्ड, पॅन कार्ड व मतदान कार्ड औरंगाबाद ते बीड बस प्रवासात हरवले आहे. सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क
९८६०२९७९२०